सातारा दि.३०/०३/२०२३

# प्रसिध्दीपत्रक
# सातारा पोलीस भरती - २०२१

## लेखी परिक्षेस पात्र उमेदारांकरीता सुचना

सातारा जिल्हा पोलीस भरती - २०२१ मधील लेखी परीक्षेस पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा **दि.०२/०४/२०२३ रोजी ०८.३० ते १०.०० या वेळेत छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा, यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय, सातारा व धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय, सातारा या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे.** लेखी परीक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांनी नमुद परीक्षा केंद्रावर ०२ (दोन) तास पुर्वी पोहोचणे आवश्यक आहे. परीक्षेस येण्यास विलंब झाल्यास कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही अशा उमेदवारांना परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही तसेच त्यांना लेखी परिक्षेकरिता पुन्हा संधी देण्यात येणार नाही. सदर लेखी परीक्षेकसाठी महाआयटीकडून प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आलेले असून policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून घ्यावे.

उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या भुलथापांना व आमिषाला बळी पडू नये. असे गैरप्रकार करताना कोणी आढळून असल्यास नियंत्रण कक्ष, सातारा यांचे ०२१६२-२३३८३३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

लेखी परिक्षा सुरु झाल्यानंतर ते परिक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारांस कोणत्याही कारणासाठी परिक्षा केंद्राबाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

इतर जिल्हयातून तसेच सातारा जिल्हयातील दुर्गम भागातून येणाऱ्या उमेदवारांची राहण्याची व्यवस्था छत्रपती शाहु क्रीडा संकूल, एस.टी.स्टँन्ड शेजारी, सातारा या ठिकाणी करण्यात आलेली आहे. राहणेबाबत काही अडचणी आल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक, विठ्ठल शेलार मोबाईल क्र.९९२३६६६०६४ यांचेशी संपर्क साधावा.

उमेदवारांनी लेखी परिक्षेस येताना खालील प्रमाणे कागदपत्रे सोबत घेवून येणे आवश्यक आहे अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१. आवेदन अर्जाची प्रत
२. हॉल तिकीट प्रत
३. ओळखपत्राचा पुरावा म्हणून मुळ ( आधार कार्ड, पासपोर्ट, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळखपत्र ) यापैकी एक ओळखपत्र आवश्यक आहे.
४. दोन पासपोर्ट साईज फोटो

उमेदवारांनी सोबत डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक घडयाळ, कॅलक्युलेटर, ब्लूटुथ हेडफोन, कॅमेरा असे कोणत्याही प्रकारची साधने सोबत बाळगू नयेत. असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्रा बाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. जर असे साहित्य लेखी परिक्षेवेळी सोबत बाळगल्याचे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार लेखी परिक्षेवेळी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करताना आढळल्यास त्यास संपुर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र करण्यात येईल.

पोलीस अधीक्षक, सातारा.